कोतोली 3.7.26

अर्जदार तर्फे वकील – अॅड.ए.बी.पाटील

जाहिरनामा

**मा. दिवाणी न्यायाधिश, क-स्तर, पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**(श्रीमती एस.व्ही.जंगमस्वामीसो)**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं.२९/२०२६**

**नि.नं.६/डी** दि. ७/३/

१) सादू जिवबा मस्कर,
व.व. ६८, धंदा - शेती,
रा. कोतोली, ता पन्हाळा, जि कोल्हापूर

२) सिंधू महादेव मस्कर,
व.व. ७५, धंदा – गृहिणी,

३) विकास महादेव मस्कर,
व.व. ५३, धंदा - नोकरी उभयता
रा. जेएन २/१९/बी, सुवर्ण सागर अपार्टमेंट,
बालाजी मंदिराजवळ, सेक्टर ९,नवी मुंबई, ठाणे, ४००७०३ **----- अर्जदार**

४) वैशाली शंकर पाटील,
व.व. ५५, धंदा – गृहिणी,
रा. जगन्नाथ प्लाझा अपार्टमेंट रूम २०५, दुसरा मजला, कणकवली, सिंधुदुर्ग

५) वैदेही श्रीराम पडवळे,
व.व. ५०, धंदा – गृहिणी,
रा. २०१८ ख फ्लॅट न ३१४, अनुबळ कॉम्प्लेक्स, राजारामपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर

६) आशा महिपती पाटील
व.व. ५७, धंदा - गृहिणी
रा.रूम न ९, मनिराम दुबे चाळ, शोभनाथ दुबे रोड, अशोक नगर,
घरटन पाडा नं २, दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८

७) सुदर्शन महिपती पाटील
व.व. ३७, धंदा - नोकरी,
रा. डी ६०२ लिली बिल्डींग, यशवंत नगर विरार वेस्ट, पालघर ४०१३०३

विरुद्ध

कुणीही नाही **-----वि.प.**

दि बॉम्बे रेगुलेशन अॅक्ट १८२७, कलम
३ नुसार वारसा दाखला मिळणेबाबत अर्ज

या जाहिरनाम्याद्वारे सर्वांना कळविणेत येते की,

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयाकडे दि.०७/०५/२०२६ इ. रोजी अर्ज दाखल करुन यातील अर्जदार यांचा विनंती अर्ज असा की,

**मिळकतीचे वर्णनः- मौजे कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील-**

अ) नगर भुमापन (सि.स.) क्र. ५०६ चे एकूण क्षेत्र १५५ चौ.मी. पैकी धोंडूबाई तुका पाटील यांचे नावे मालमत्ता पत्रकी नोंद असलेली मिळकत.

आ) नगर भुमापन (सि.स.) क्र. ४०७ चे एकूण क्षेत्र १५५.९० चौ.मी. पैकी धोंडूबाई तुका पाटील यांचे नावे मालमत्ता पत्रकी नोंद असलेली मिळकत.

येणेप्रमाणे वर नमूद मिळकत. त्यास सोयीकरिता "सदर मिळकत" असे संबोधले आहे.

सदर मिळकत ही धोंडूबाई तुका पाटील यांची वडिलार्जित मिळकत होती त्यानुसार त्यांचे नावाची मालमत्ता पत्रकी मालक सदरी नोंद देखील आहे. कै. धोंडूबाई तुका पाटील या दि.३०/०९/२००२ ई. रोजी त्यांचे सासरी मौ. करंजफेण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील राहते घरी मयत झालेले आहेत तसेच त्यांचे पती तुका उर्फ तुकाराम कृष्णा पाटील हे देखील दि २४/०९/२००८ इ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र १ हे मयत कै धोंडूबाई तुका पाटील यांचे सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. २ ते ५ हे त्यांचा दुसरा सखा भाऊ कै महादू जिवबा मस्कर यांचे सरळ वारस असून सदर मिळकतीचे मालमत्ता पत्रकी महादूचे जागी वारसा हक्काने त्यांचे नावाची नोंद देखील झाली आहे. तसेच अर्जदार क्र ६ व ७ हे मयत कै धोंडूबाई यांचे बहिण कै अकुताई बापू पाटील हिचे सरळ वारस असून सदर मिळकतीचे मालमत्ता पत्रकी अकुताई चे जागी वारसा हक्काने त्यांचे नावाची नोंद देखील झाली आहे. कै धोंडूबाई तुका पाटील व तुका उर्फ तुकाराम कृष्णा पाटील यांना त्यांचे विवाह संबंधातून कोणतेही अपत्य नाही. वर नमूद अर्जदार हेच कै धोंडूबाई तुका पाटील यांचे सदर मिळकतीस कायदेशीर वारस असून अन्य कुणीही वारस नाहीत. कै धोंडूबाई तुका पाटील व तुका उर्फ तुकाराम कृष्णा पाटील यांना त्यांचे विवाह संबंधातून कोणतेही अपत्य नसलेने त्यांना हिंदू वारसा कायद्यातील तरतुदीनुसार सदर मिळकतीस प्रस्तुत अर्जदार हेच एकमेव वारस आहेत. याव्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. त्यामुळे हिंदू वारसा कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचा वारसा अर्जदार यांना प्राप्त होतो. त्यामुळे कै धोंडूबाई तुका पाटील यांचे पश्चात सदर मिळकत ही वडिलार्जित असलेने मिळकतीबाबत त्यांचे वारसासंबंधी अर्जदार यांचे नावे वारसा दाखला मिळावा म्हणून प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी दाखल केलेला आहे. अर्जदार हे हिंदू वारसा कायद्यातील तरतुदीनुसार कै धोंडूबाई तुका पाटील यांचे कायदेशीर हक्काने वारस ठरतात. त्यांचे नावे असलेल्या मिळकतीबाबत अर्जदार हे उप अधिक्षक, नगर भूमापन कार्यालय पन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचेकडे कै धोंडूबाई तुका पाटील यांचे मृत्यूनंतर वेळोवेळी आजतागायत वारसाने मालमत्ता पत्रकी नावाची नोंद करणेकरिता गेले असता तत्सम संबंधित अधिकारी यांनी दिवाणी कोर्टाकडून वारसा दाखला आणणेबाबत अर्जदार यांना सांगितले. त्यामुळे अर्जदार यांना सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले.

त्याअर्थी या जाहिरनाम्याद्वारे कळविणेत येते की, मयत कै. धोंडूबाई तुका पाटील यांना वर नमुद केले अर्जदार यांचे व्यतिरीक्त अन्य कोणी वारस असलेस अथवा नमुद अर्जदार वारस असलेबाबत हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी अगर त्यांचे तर्फे वकिल यांनी दिनांक ०२/०७/२०२६ इ. रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात हजर होवून आपले लेखी म्हणणे मांडावे तसे जर झाले नाही. तर अर्जदार यांनी दाखल केलेला पुरावा गृहीत धरुन अर्जदार यांना वारसा दाखला दिला जाईल. त्यानंतर येणा-या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

आज दिनांक - १२/०५/२०२६ इ. रोजी माझे सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

हुकमावरुन

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क-स्तर पन्हाळा.

क.लि.

प्रति, प्रमुख बेलिफ

सदरहू जाहिरनामा मयताचे घर, गावचावडी नोटीस बोर्ड येथे मुदतीत चिकटवून डको रिपोर्ट व्हावा.

३ क्रमांक १९६०

क.लि.

स.अ.

पुरवणी - किरकोळ दिवाणी अर्ज नं - २८/२०२६ नि. ७/डी सोबत

साक्ष म्हणून

अर्जदार नं. १

**श्री. मोरारजी बाबुराव सातपुते**
**पोलीस पाटील**
**कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.**

स.नि.डा.हा.आं.श्री/सौ. ५१६
शिवबा मस्कर ......यांचा असे दस्तूर असे सुन
Amaskar

## बेलिफ रिपोर्ट

हु॥ प्रमाणे दि. १६/०६/२०२६ इ. रोजी दिले पत्याचे गावी येवून गा. का. पोलीस पाटील यांचे माहीतीने अर्जदार यांचा तपास करुन मे. कोर्ट हुकमावरुन सदरच्या जाहीरनामाची एक प्रत मयताच्या घराच्या उघडे दर्शनी दरवाजेवर सहज दिसेल असे ठिकाणी डिंकाने डकवुन प्रसिध्द केली आहे.

तसेच जाहीरनामाची एक प्रत गावचावडी कोतोली यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर डिंकाने डकवून प्रसिध्द केली आहे सोबत गा. का. पोलीस पाटील हजर होते साक्ष म्हणून त्यांची सदरी सही घेतली आहे

मे. जा. व्हावे दि - १६/०६/२६

बेलीफ

## बेलिफ रिपोर्ट

हु॥ प्रमाणे दि. १८/०६/२६ इ. रोजी मे. कोर्ट मजकुरी हजर जाहीरनामाची एक प्रत मा. दिवाणी न्यायालय क. स्तर. पन्हाळा यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली आहे.

मे. जा. व्हावे दि. १८/०६/२६

बेलीफ

## सहा. अधिक्षक रिपोर्ट

सदरहु जाहीरनामा योग्य ठिकाणी योग्य वेळी योग्य रित्या प्रसिध्द केलेचे बेलिफ रिपोर्ट वरुन दिसीत होईल

मे. जा. व्हावे. दि. १८/०६/२६

सहा. अधिक्षक

[illegible]